!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४०९ ०७/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## लोकप्रतिनिधींच्या निधीच्या कामांना गती द्या- खासदार चंद्रकांत खैरे
## तीन दिवसात प्रोग्रेस रिपोर्ट सादर करा जिल्हाधिकारी निधी पांडे यांच्या सूचना

**संभाजीनगर दि ७ –** पंधराव्या लोकसभेतील अपूर्ण कामे व सोळाव्या लोकसभेतील सुरु असलेल्या कामांचा आढावा घेत जिल्हानियोजन व लोकप्रतिनिधींच्या निधीतील कामांना गती देण्याचे निर्देश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले.जिल्यातील सुरु व अपूर्ण कामांचा प्रोग्रेस रिपोर्ट तीन दिवसात सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी पांडे यांनी दिले.

सांसद आदर्श ग्राम, जिल्यातील अपूर्ण व रेंगाळलेली विकास कामे या संदर्भात जिल्हाधिकारी निधी पांडे यांच्या दालनात बैठक पार पडली. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती व्ही आर गाडेकर,जिल्हा नियोजन अधिकारी हेमंत आहेर, उपविभागीय महसुल अधिकारी लक्ष्मीकांत सानाळकर, वैजापूर बिडीओ प्रशांत शिर्के, एस जी वड्डे, नगरसेवक नंदकुमार घोडेले, अशोक पटवर्धन,डॉ अण्णा शिंदे, अशोक शिंदे, संजय अवस्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय महामार्ग क्र २११ वर जीवघेणे खड्डे झाले आहेत शिवाय टापरगाव पुलाच्या दुरुस्ती तातडीने करण्याची गरज असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी लक्षात आणून दिले त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने येत्या आठवडाभरात टापरगाव पुलाच्या दुरुस्तीचे काम नव्या तंत्रज्ञानाने सुरु करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता श्रीमती व्ही आर गाडेकर यांनी सांगितले. कन्नड तालुक्याच्या मागण्या आणि आमदार हर्षवर्धन जाधव यांनी मागणी केलेल्या कामांच्या आढावा खासदार खैरे यांनी घेतला. पॉवर ग्रीड कामात पिंप्रीराजा, आडगाव येथील बाधित शेतकऱ्यांच्या वृक्षांचा मावेजा अजून मिळत नसल्याचे अशोक शिंदे यांच्यासह शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.मग्रारोह ची गंगापूर जिल्यात बंद असल्याचे संजय शेळके यांनी सांगितले. कन्नड तालुक्यातील वैसपूर, टापरगाव, हतनूर, टाकळी, अंतापूर, जळगाव, अलाहपूर, येथील शेतकऱ्यांचे शिवणा टाकली प्रकल्पातून पाणी उपसा करू नये म्हणून वीज कनेक्शन कापल्यामुळे वर्षभराचे हातचे आलेले पिक जाण्याच्या मार्गावर आहे, दुष्काळी परिस्थितीत हे पिक गेले तर शेतकऱ्यांना आत्महत्येशिवाय पर्याय नसणार त्यासाठी एक महिना तरी त्यांना पाणी मिळावे अशी मागणी अण्णा शिंदे यांनी केली. या दोन्ही विषयी वीज वितरण च्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना न्याय मिळून देऊ असे आश्वासन निधी पांडे यांनी दिले. आडगाव भोसले या सांसद आदर्श ग्राम साठी खासदार चंद्रकांत खैरे यांनी दत्तक घेतलेल्या गावालाही लवकरच भेट देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागात राबवल्या जाणाऱ्या ५६ योजनांच्या निधी परत जाणार नाही यासाठी दक्षता घ्या. शिवाय डोंगरी विकासची कामांना गती द्या आणि लोकप्रतिनिधींच्या शिफारसीतील कामांना प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा अश्या सूचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या. कोणत्याही निधीतून काम पूर्ण झाले तरी तेथे कामाची पूर्ण माहिती देणारा फलक लावा, सांसद आदर्श गावाच्या कामांसाठी अधिकाऱ्यानी समन्वय ठेऊन कामाला गती द्यावे असे आदेश जिल्हाधिकारी निधी पांडे यांनी दिले.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन/ गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525